**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांना प्रथम टप्यात निधी वितरीत करणे बाबत.**
**सती अनुसया माता मंदिर, पारडसिंगा, ता.काटोल जि. नागपूर.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः तीर्थवि-२०२५/ई-१२७८९५३/यो-११**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई ४०० ००१
**दिनांक: १२ सप्टेंबर, २०२५**

**संदर्भ:-** १) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : तीर्थवि-२०२४/प्र.क्र.१६९/यो-११ दि. ११ ऑक्टोबर, २०२४.

**प्रस्तावना:-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत "**सती अनुसया माता मंदिर, पारडसिंगा,ता.काटोल जि. नागपूर**." या "ब" वर्ग ग्रामीण यात्रास्थळाच्या ठिकाणी विविध विकास कामांकरीता संदर्भीय शासन निर्णयान्वये **रु. ४,९९,८९,८१५.००** ची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, मात्र निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. सबब, सदर यात्रास्थळाच्या ठिकाणी करावयाच्या विकास कामांना प्रथम टप्यात प्रशासकीय मान्यतेच्या २०% निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) (२५१५ २५६६) ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या योजनेंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात एकूण रु. ८००.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. सदर अर्थसंकल्पीत निधीतून खालील "ब" वर्ग यात्रास्थळास प्रथम टप्यात प्रशासकीय मान्यतेच्या २०% म्हणजेच **रु.१,००,००,०००/- (रू. एक कोटी फक्त)** निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांना वितरीत करण्यात येत आहे.

| अ. क्र | तीर्थक्षेत्राचे नाव | कामांचे नाव | प्रशासकीय मान्यता रक्कम | वितरीत करावयाची २०% रक्कम |
|---|---|---|---|---|
| | **सती अनुसया माता मंदिर, पारडसिंगा, ता. काटोल जि. नागपूर.** | १. Multiutility Hall (First Floor) | ३,२३,३५,१२५.०० | **१,००,००,०००.००** |
| | | २. बाह्य पाणी पुरवठा | १६,१६,७५६.०० | |
| | | ३. विद्युतीकरण संबंधीत कामे | ४६,९६,०६४.०० | |
| | | ४. कर व इतर चार्जेस | १,१३,४१,८७०.०० | |
| | | **एकूण** | ४,९९,८९,८१५.०० | **१,००,००,०००.००** |

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांनी सदर निधी वितरीत करताना संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.

३. सदर खर्च मागणी क्र.एल-०३ "२५१५ इतर ग्रामविकास कार्यक्रम-१९६-जिल्हापरिषद/जिल्हास्तरीय पंचायतींना सहाय्य (००) (०८) ग्रामीण भागातील यात्रास्थळांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम (२५१५ २५६६) ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. वरीलप्रमाणे ज्या कामाच्या प्रयोजनासाठी निधी उपलब्ध करून दिलेला आहे, तो त्याच कामावर तात्काळ खर्च करून, सदर सहायक अनुदानाच्या विनियोजनासंबधीचे उपयोगिता प्रमाणपत्रे, महालेखापाल कार्यालय, मुंबई व या विभागास पाठविण्यात यावी. तसेच वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र: अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०७.०४.२०२५ मधील अटीची व शर्तीचे पालन करण्यात यावे.

५. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या मान्यतेने, वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र. ३५७/२०२५/व्यय-१५, दि. १९.०५.२०२५ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९१२११३६५६५५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

KALU GONYA VALVI

Digitally signed by KALU GONYA VALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=714701FC3DB9C38A46F4CD82E1E450B51A9E92EEDE8C323934F82EDB538D3B20, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8C5D0F275C3D9A21DB07FECF7919C2D83796E88930D62D44E7A4A6D4CBEE7E0E, cn=KALU GONYA VALVI
Date: 2025.09.12 15:05:56 +05'30'

**( का.गो. वळवी )**
**सह सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव.
६) मा. राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
८) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
९) विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

१०) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव.
११) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर
१२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, धाराशिव.
१३) जिल्हा कोषागार अधिकारी, धाराशिव.
१४) नियोजन विभाग, (का-१४४४) मंत्रालय, मुंबई-३२.
१५) वित्त विभाग (व्यय १५, अर्थसं १६, अर्थसं १७) मंत्रालय,मुंबई ३२.
१६) कार्यासन क्र.वित्त-७, वित्त-१, वित्त-८, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) निवड नस्ती (का.यो-११), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.